नवा काळ

मुंबई, मंगळवार २९ जून २०१०, पान ८

मुंबई,
मंगळवार,
२९ जून २०१०
पान ४

# चित्रायण

नंदकुमार पाटील :-लेखन • संकलन • कलादिग्दर्शन

नवा काळ



## भारतात 'थ्रीडी'चे आगमन

परदेशातून आलेला प्रत्येक चित्रपट कोणत्या तरी तांत्रिक बाजूने पुढे आलेला असतो. कृष्णधवलपासून ते रंगीतयुगापर्यंत अनेक वाटचाली या जगभराच्या चित्रपटाने केलेल्या आहेत. डिजीटल फोटोग्राफीमुळे चित्रपटात क्रांती निर्माण झालेली आहे. ॲनिमेशन चित्रपटाने तर तमाम प्रेक्षकांना आपल्या ताब्यात घेतलेले आहे. अशा स्थितीतच थ्रीडी तंत्राने निर्माण केलेले चित्रपट भारतात आले होते. अलिकडच्या काळात अवतार हा चित्रपट कायम रसिकांच्या मनात राहणार चित्रपट आहे. तांत्रिकदृष्ट्या विकसित असलेला हा चित्रपट म्हणावा लागेल. यापूर्वी छोटा चेतन हा चित्रपट आला होता. पण अवतार या चित्रपटाने जी काही गुणवत्ता दाखवली होती ती गुणवत्ता थक्क करणारी आहे. भारतीय निर्मात्याला असा काहीसा चित्रपट निर्माण करायचा झाला तर या तंत्रासाठी त्याला परदेशी वारी करावी लागत होती. पण आता हे तंत्र भारतातही विकसित होणार आहे असे दिसते. अवतारप्रमाणे भारतीय चित्रपटसुद्धा विकसित होतील अशी आशा निर्माण झालेली आहे. ही कामगिरी भारतातील प्रख्यात प्रसाद प्रोडक्शन यांनी हा कॅमेरा भारतात आणलेला आहे. प्रसाद ग्रुपचे म्हणजे एल.व्ही.प्रसाद यांचे चिरंजीव रमेश प्रसाद यांनी ही कामगिरी बजावलेली आहे. प्रसाद ग्रुपने यापूर्वी हमराही, खिलौना, एक दुजे के लिए, बिदाई आदी अनेक चित्रपटांची निर्मिती केलेली आहे. छोटा चेतन हा त्यापैकी एक आहे. अवतारने मिळवलेली लोकप्रियता लक्षात घेऊन हा थ्रीडी कॅमेरा भारतात आणण्याची त्यांनी इच्छा केली. त्यानिमित्ताने भारतीय चित्रपटसृष्टी तंत्रज्ञानात आणखीन एक पाऊल पुढे टाकत आहे हे यातून सिद्ध होते.